MHST160004822019

**दरखास्त क्र. ०६/२०१९ मधील नि. ६५**

**खालील आदेश**

(अशोक विठ्ठल खडसरे वि.

दत्तात्रय विठ्ठल खडसरे व इतर)

प्रस्तुतचा अर्ज धनकोने दरखास्तीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे. धनकोचे असे कथन आहे की, दरखास्तीच्या मिळकतीच्या वर्णनामध्ये अनुक्रमांक १ यामध्ये गट क्र. ६१/२ असे नमुद केलेले क्षेत्र ०.०२ आर ऐवजी " पो.ख. ०.९६ आर पो.ख. ०.०२ आर " असे नमुद करणे आहे. तसेच दावा मिळकतीच्या आकार कॉलम मध्ये २४=४३ पैसे यानंतर "१२=६३ पैसे असे नमुद करण्याचे आहे ". तसेच परीच्छेद अनुक्रमांक २ यातील गट क्रमांक ६५=१ड चे आकार कॉलम मध्ये ८=५० पैसे यानंतर " ३=६६ पैसे " तसेच अनुक्रमांक ४ मध्ये गट क्र. ६१/ए यानंतर क्षेत्र ०=०२ आर याऐवजी " ०=९५ आर व पोटखराबा ०=२ आर तसेच आकार कॉलममध्ये २४=४४ पैसे यानंतर १२=६२" असा मजकुर लिहीण्यास परवानगी मिळावी. प्रस्तुतची प्रस्ताविक दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असुन सदरच्या चुका या टंकलेखनाच्या चुका आहेत. सदरच्या चुका या नजरचुकीने झालेल्या आहेत. दरखास्तीमध्ये दुरुस्ती केल्यास त्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामध्ये धनकोने मागितल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी.

२. ऋणको क्र. १ तर्फे सदरच्या अर्जास म्हणणे दाखल करण्यात आले. त्यांच्या म्हणण्यानुसार धनकोने मागितलेली दुरुस्ती ही हुकूमनाम्याच्या अनुषंगाने करणे जरुरीचे आहे. त्यांची दुरुस्ती करण्यास कोणतीही हरकत नाही.

३. सर्व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरच्या दरखास्तीमध्ये केवळ ऋणको हजर झालेले आहेत. इतर ऋणको क्र. २ ते ९ यांना नोटीसची बजावणी होवुन देखील ते हजर झालेले नाहीत. प्रस्तुतची दरखास्त ही नियमित दिवाणी दावा क्र. ११९/२००२ च्या न्यायनिर्णयानुसार व हुकूमनाम्यानुसार अंमलबजावणी करीता दाखल केलेले आहे. नि. ९ वर हुकूमनाम्याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. त्यामध्ये गट क्र. ६१/२ चे क्षेत्र ०=९६ आर पोटखराबा ०=२ आर आकार २४=४३ तसेच गट क्र. ६२/१/२ याचा आकार ८=५० पैसे तसेच गट क्र. ६१/ए याचे क्षेत्र ०=९७ आर आणि आकार

२४=४४ असे नमुद केलेले आहे. सदरच्या दाव्यामध्ये वादीला ८/२१ तसेच प्रतिवादी क्र. १ ला ८/२१ हिस्सा जाहीर करण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ४, ५, ७ व ८ यांना प्रत्येकी १/२१ आणि प्रतिवादी क्र. ६ए ते ६क यांना एकत्रीतपणे १/२१ हिस्सा नमुद केलेले आहे. तसेच दरखास्त वाटपाची असल्यामुळे दावा मिळकतीमधील वादीच्या हिश्श्यानुसार मिळकतीचे वर्णन करणे आवश्यक आहे. दरखास्तीचे अवलोकन केल्यास असे दिसुन येते की, धनकोने गट क्र. ६१/२ चे क्षेत्र ०.०२ आर, ६२/१/ड चे क्षेत्र ०.३६ आर आणि ६१/६१ चे क्षेत्र ०.०२ आर असे नमुद केलेले आहे. हुकूमनाम्यातील वर्णनानुसार दरखास्तीमध्ये दावा मिळकतीचे वर्णन केलेले नाही. सदरचे वर्णन चुकीचे नमुद करण्यात आलेले आहे. दरखास्तीचे स्वरुप पाहता दावा मिळकतीच्या वाटपाच्या दृष्टीने योग्य वर्णन करणे योग्य व न्यायोचीत आहे. धनकोने मागितलेल्या दुरुस्ती नुसार दरखास्तीचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. वरील कारणमिमांसेवरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आ दे श**

१. धनकोचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. धनकोने प्रस्तुतची दुरुस्ती १४ दिवसांचे आत करावी.

CHHAYA VIKRAM SHIRSAT
Digitally signed by CHHAYA VIKRAM SHIRSAT
Date: 2022.11.28 17:04:30 +0530

(सी. व्ही. शिरसाट)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.

ठिकाण – वाई.
दिनांक – २८.११.२०२२.